पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, जुना मुंबई पुणे रस्ता, पाटीलनगर, रांका गॅस शेजारी, महाविर चौक, चिंचवड स्टेशन, चिंचवड, पुणे.१९
फोन नं.०२०-२७४७२२१८ ईमेल- pspimpri.pcpc-mh@gov.in

प्रेस नोट दि.०२/०९/२०२४

## देशी बनावटीचे पिस्टल व जीवंत काडतुसे बाळगणारे सराईत गुन्हेगारासह तडीपार आरोपीस पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकाकडुन अटक.

## आरोपींचे ताब्यातुन एकुण ३ देशी बनावटीचे पिस्टल व चार जीवंत काडतुसे असा एकुण १,५२,०००/-रूपये एकुण किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत बेकायदेशीर अग्निशस्त्रे व दारूगोळा बाळगणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, श्री डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, श्री वसंत परदेशी, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केले आहे. त्यानुसार आम्ही स्वतः तसेच सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, सचिन हिरे यांनी अवैध अग्निशस्त्रे बाळगणा-या गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार आम्ही पिंपरी पोलीस ठाणेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अशोक कडलग, यांना सदरची मोहीम राबवुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक ३१/०८/२०२४ रोजी पिंपरी तपास पथकाचे पोलीस अंमलदार २३५५ रोहीत वाघमारे व पोलीस अंमलदार २९७० गणेश काकड यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, एक रेकॉर्डवरील गुन्हेगार हा ॲटोक्लस्टकडे जाणारे ब्रीजचे सर्व्हिसर रोडवर पिंपरी पुणे येथे सायं. १८/३० वाजताचे सुमारास कोणालातरी भेटण्यासाठी येणार आहे व त्याचेकडे देशी बनावटीचे पिस्टल आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी सापळा रचुन बातमी प्रमाणे एक इसम ॲटोक्लस्टरकडे जाणारे ब्रीजचे सर्व्हिस रोडवर पिंपरी पुणे येथे आला व रोडवर उभा राहुन कोणाची तरी वाट पाहत असल्याबाबत खात्री झाल्याने तपास पथकाने शिताफिने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव जुनेद जमील शेख वय-१८ वर्ष रा.क्यु बिल्डींग रूम नं.२३ मिलींद नगर पिंपरी पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचे ताब्यात खालील वर्णनाच्या दोन देशी बनावटीच्या पिस्टल व दोन काडतुसे मिळुन आली त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

१) ५०,०००/- रू.किं.चे पांढ-या धातूचे देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस काळ्या रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यास पांढ-या धातूचेच मॅगझिन असे जु.वा.किं.अं.

२) ५०,०००/- रू.किं.चे पांढ-या धातूचे देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस चॉकलेटी रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यास पांढ-या धातूचेच मॅगझिन असे जु.वा.किं.अं.

३) १०००/- रु. किं.चा दोन जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.

--------------

**१,०१,०००/-** एकुण

तसेच दिनांक ३१/०८/२०२४ रोजी पिंपरी तपास पथकाचे पोलीस अंमलदार २६५७ विकास रेड्डी यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, पिंपरी पोलीस ठाणेकडील तडीपार आरोपी गणेश ऊर्फ मॅड भुंगा कांबळे, रा. भाटनगर समोर, रेल्वे लाईन शेजारी, निराधार नगर, पिंपरी, पुणे व रेकॉर्डवरील आरोपी तौफीक ऊर्फ तौफया चांद शेख हे निराधार नगर वस्तीमध्ये पिंपरी येथे हातात पिस्टल घेवुन हवेत फिरवुन दहशत करीत आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी सापळा रचुन बातमी प्रमाणे निराधार पिंपरी पुणे येथे जावुन खात्री करुन तडीपार आरोपी गणेश भुंगा कांबळे, वय- २१ वर्षे, रा. भाटनगर समोर, रेल्वे लाईन शेजारी, निराधार नगर, पिंपरी, पुणे दहशत करीत असल्याचे दिसुन आल्याने त्यास शिताफिने ताब्यात घेतले व त्याचेकडे एक देशी बनावटीच्या पिस्टल व दोन काडतुसे मिळुन आली त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

१) ५०,०००/- रू.किं.चे काळया धातूचे देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस काळ्या रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यावर स्टारचे चिन्ह असलेले व त्यास पांढ-या धातूची मॅगझिन असे जु.वा.किं.अं.

२) १०००/- रु. किं.चा दोन जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.

---------------

**५१,०००/-**

------------------------------------------------------------------ooo----------------------------------------------------------------

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा. श्री सचिन हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो. पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, यांचे मार्गदर्शनाखाली अशोक कडलग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पिंपरी पोलीस ठाणे, धनंजय कापरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, सुहास आव्हाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी तपास पथकातील सपोनि दिगंबर अतिग्रे, पो.उप निरीक्षक शाकिर जिनेडी, पो.हवा. ११६५ बारशिंगे, पो.हवा. ६८४ हांडे, पो.हवा.९७९ बेंदरकर, पो.हवा. ७९७ वारडे, पोहवा १४२५ शिंदे, पोहवा ९८५ झांबरे, पो.हवा.१८७ अभंगराव, पो.ना.१९१७ बंड, पो.ना.१८८० मुजावर, पो.शि. २६५७ रेड्डी, पो.शि.२७२२ जानराव, पो.शि.२३५५ वाघमारे, पो.शि.२९७० काकड, पो.शि.२५७८ आचार्य, पो.शि.३३५७ बजबळकर, पो.शि.३६०९ ढवळे, पोशि ३३१९ पुंडे, पो.शि.३४५३ कवठेकर, मपोहवा १६८८ कोंडे, म.पो.ना.१७८६ कोल्हे, मपोशि २१७० चव्हाण यांनी केली आहे.

**( स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त, परि-०१
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय